**ग्रामीण कृषी मौसम सेवा**
भारत मौसम विभाग
केंद्रीय कापूस संशोधन संस्था
नागपूर

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला

**दिनांक : 14-08-2026**

**नागपूर(महाराष्ट्र) साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2026-08-14 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)**

| हवामान घटक | 2026-08-15 | 2026-08-16 | 2026-08-17 | 2026-08-18 | 2026-08-19 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 11.7 | 66.4 | 8.7 | 7.5 | 4.1 |
| कमाल तापमान (अं.से) | 27.2 | 26.6 | 27.5 | 28.2 | 30.6 |
| किमान तापमान (अं.से) | 23.7 | 23.2 | 23.5 | 24.1 | 23.9 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 93 | 93 | 92 | 91 | 90 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 79 | 81 | 78 | 75 | 63 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 16 | 17 | 16 | 13 | 13 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 269 | 266 | 269 | 269 | 272 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 8 | 8 | 8 | 8 | 7 |
| चेतावणी | गडगडाटी वादळे आणि विजा, स्क्वॉल; मजबूत पृष्ठभाग वारे | मुसळधार पाऊस; गडगडाटी वादळे आणि विजा, स्क्वॉल | गडगडाटी वादळे आणि विजा, स्क्वॉल | चेतावणी नाही | चेतावणी नाही |

### भविष्यवाणी सारांश:

• नागपुर जिल्ह्यामध्ये, भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या जिल्हास्तरीय अंदाजानुसार, पुढील ५ दिवसा दरम्यान आकाश आंशिक ढगाळ ते मुख्यतः ढगाळ राहण्याची शक्यता, • दिनांक १४, १७ आणि १८ ऑगस्ट २०२६ रोजी बऱ्याच ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची अधिक शक्यता, • दिनांक १५ आणि १६ ऑगस्ट २०२६ रोजी सर्वत्र ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची अधिक शक्यता वर्तविण्यात आली आहे.

### हवामान चेतावणी (पुढील दिवशी 08:30 IST पर्यंत वैध):

• दिनांक १४ ऑगस्ट २०२६ रोजी काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळी वाऱ्याची (३०-४० किमी प्रति तास) शक्यता, • दिनांक १५ ऑगस्ट २०२६ रोजी तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस आणि मेघगर्जना व विजांचा कडकडाट होण्याची शक्यता, • दिनांक १६ ऑगस्ट २०२६ रोजी तुरळक ठिकाणी घगर्जना व विजांचा कडकडाट होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

### हवामान चेतावण्यांचे कृषीवरील संभाव्य प्रभाव आणि संबंधित एग्रोमेट सल्ले:

• मेघगर्जना व विजांच्या कडकडाटामुळे शेतकरी, शेतमजूर तसेच पशुधनाला दुखापत होण्याची किंवा जीवितहानी होऊ शकते. पावसामुळे कृषी उत्पन्न बाजार समिती किंवा खुल्या बाजारात विक्रीसाठी आणलेला शेतमाल भिजून त्याची गुणवत्ता खराब होऊ शकते.

### कृषि सल्ला:

• सार्वत्रिक स्वरूपाचा पाऊस, मेघगर्जना, विजांचा कडकडाट होण्याची शक्यता लक्षात घेता, कृषी रसायनांच्या फवारणीची कामे, उभ्या पिकात खते देण्याची कामे तसेच आंतरमशागतीची (खुरपणी/डवरणी इत्यादी.) कामे पुढील ३ दिवस पुढे ढकलावी. • मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याचा अंदाज वर्तविलेल्या दिवशी गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्या व इतर पाळीव जनावरे मोकळ्या जागेत चरावयास सोडण्याचे टाळावे. जनावरे हे खुल्या पाण्याचे स्त्रोत, नदी किंवा तलाव व ट्रॅक्टर व इतर धातूच्या अवजारांपासून दूर ठेवावे. जनावरांना गोठ्यामध्ये पुरेश्या चारा व पाण्याची व्यवस्था करावी. शेतकरी व शेतमजूर बांधवांनी विजांचा कडकडाट होण्याचा अंदाज लक्षात घेता स्वतः ची तसेच पशुधनाची काळजी घ्यावी. झाडाखाली आश्रय घेणे कटाक्षाने टाळावे तसेच पशुधनाचा सुद्धा झाडाखाली आश्रय टाळावा. • कपाशीतील रोप अवस्थेतील मुळकुज रोग व्यवस्थापन: मुळकुज रोगग्रस्त रोपे ठिकठिकाणी आढळून येऊ शकतात. सुरुवातीच्या लक्षणांनुसार रोपांना १ किलो ट्रायकोडर्मा व्हिरिडी अथवा ट्रायकोडर्मा हर्झियानम विरघळणारी पावडर किंवा द्रवरूप स्वरूपातील चांगल्या कुजलेल्या ५० किलो शेणखत किंवा कंपोस्टमध्ये मिसळून १ एकर क्षेत्रात जमिनीत मिसळावे. किंवा कार्बेन्डाझिम ५० डब्ल्यूपी @ १२ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून रोगग्रस्त ठिकाणी आळवणी (स्पॉट ड्रेंचींग) करावी, आळवणी करण्यासाठी तयार केलेल्या द्रावणाचे प्रमाण आळवणी करण्यासाठी मुळ्या ओल्या होतील एवढेच वापरावे.

### संक्षिप्त संदेश सल्ला:

| |
|---|
| मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याचा अंदाज वर्तविलेल्या दिवशी गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्या व इतर पाळीव जनावरे मोकळ्या जागेत चरावयास सोडण्याचे टाळावे. |

**पिक निहाय सल्ला:**

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| मका | • मका पिकातील लष्करी अळी या किडीच्या व्यवस्थापनाकरिता कोणत्याही एका कीटकनाशकाची जसे कि, क्लोरॅन्ट्रानिलिप्रोल ९.३ टक्के प्रवाही + लॅम्ब्डा सायहॅलोथ्रीन ४.६ टक्के झेडसी प्रवाही ५ मिली किंवा स्पिनेटोराम ११.७ टक्के एससी प्रवाही, ५.१२ मिली किंवा क्लोरॅन्ट्रानिलिप्रोल १८.५ टक्के प्रवाही एससी ४.३२ मिली किंवा इमामेक्टीन बेन्झोएट ५ टक्के एसजी, ८ ग्रॅम किंवा इमामेक्टीन बेन्झोएट ५ टक्के + लुफेन्युरॉन ४० टक्के डब्ल्यूजी, १.६ ग्रॅम किंवा थायोडिकार्ब ७५ टक्के डब्ल्यूपी, २० ग्रॅम किंवा नोव्हाल्युरॉन ५.२५ टक्के + इमामेक्टीन बेन्झोएट ०.९ टक्के प्रवाही एससी, २० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| सोयाबीन | • सोयाबीन पिकातील पिवळा मोझेक विषाणू/सोयाबीन मोझेक विषाणू या रोगांच्या नियंत्रणासाठी, प्रादुर्भाव ग्रस्त झाडे मुळासकट उपटून नष्ट करावी. याव्यतिरिक्त, थियामेथॉक्सम + लॅम्डा सायहॅलोथ्रिन (१२५ मिली/हेक्टर) किंवा बीटासायफ्लुथ्रिन + इमिडाक्लोप्रिड (३५० मिली/हेक्टर) किंवा ॲसिटामिप्रिड २५ % + बायफेंथ्रिन २५% डब्ल्यूजी (२५० ग्रॅम/हेक्टर) यांसारख्या शिफारस केलेल्या पूर्व-मिश्रित कीटकनाशकांपैकी कोणत्याही एका कीटकनाशकाची फवारणी करावी.. यामुळे खोडमाशीच्या नियंत्रणास देखील मदत होईल. पिवळा मोझेक विषाणू/सोयाबीन मोझेक विषाणू या रोगाचा वाहक असलेल्या पांढऱ्या माश्यांना आकर्षित करण्यासाठी सोयाबीन पिकामध्ये पिवळे चिकट सापळे लावावे. (आयआयएसआर- इंदोर शिफारस). • सोयाबीन पिकातील उंट अळीच्या नियंत्रणासाठी, क्लोरॅन्ट्रानिलिप्रोल १८.५% SC – १५० मि.ली. प्रती हेक्टर, किंवा इमामेक्टिन बेंझोएट ०१.९०% EC – ४२५ मि.ली. प्रती हेक्टर किंवा फ्लुबेंडीअमाइड २०% WG – २५०–३०० ग्रॅम प्रती हेक्टर किंवा फ्लुबेंडीअमाइड ३९.३५% w/w SC – १५० मि.ली. प्रती हेक्टर किंवा इंडोक्साकार्ब १५.८०% EC – ३३३ मि.ली. प्रती हेक्टर किंवा लॅम्ब्डा-सायहॅलोथ्रीन ०४.९०% CS – ३०० मि.ली. प्रती हेक्टर किंवा प्रोफेनोफॉस ५०% EC – १ लिटर/हेक्टर किंवा नोव्हाल्युरॉन + इंडोक्साकार्ब ०४.५०% SC – ८२५–८७५ मि.ली. प्रती हेक्टर किंवा क्लोरॅन्ट्रानिलिप्रोल ०९.३०% + लॅम्ब्डा-सायहॅलोथ्रीन ०४.६०% ZC – २०० मि.ली. प्रती हेक्टर किंवा ब्रोफ्लॅनिलाइड ३०० ग्रॅम प्रती लिटर SC – ४२–६२ ग्रॅम/हेक्टर या प्रमाणात कोणत्याही एका कीटकनाशकाची फवारणी करावी. |
| भात | • पेरीव धान पद्धत :-तण व्यवस्थापन:- • तण व्यवस्थापनाकरिता तण नियंत्रणासाठी पेंडीमेथॅलीन ३०% ई. सी. (उगवणपूर्व) @ ५० मि.ली. किंवा प्रेटिलाक्लोर ५०% ई. सी. (उगवणपूर्व) @ २० ते ३० मि.ली. प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पेरणीनंतर ओलावा असल्यास लगेच फवारणी व ३० दिवसांनी निंदण करावे. • उगवणपश्चात:- बिस्पायरीबॅक सोडियम २०% + पायरोझोसल्फुरॉन इथाइल १५% WGD ३५% @ ०२ gm १० लिटर पाण्यात पेरणीनंतर १० ते १२ दिवसांनी किंवा मेटसलफ्यूरॉन मिथील १०% + क्लोरिम्युरोन इथाइल १०% WP २०% @ ०.७ ग्रॅम पेरणीनंतर २० ते २५ दिवसांनी १० लिटर पाण्यात फवारणी करावी. खरीप धान : - • मित्र किडींच्या संवर्धनासाठी धान बांधावर झेंडू व चवळी पिकाची लागवड करावी. • रोपवाटीका:- खोडकिडा व गादमाशीच्या व्यवस्थापनाकरिता कार्बोफ्युरॉन ३ % दानेदार २५ किलो ग्रॅम प्रति हेक्टर (कार्बोफ्युरॉन ३ % दानेदार २५० ग्रॅम प्रति १०० वर्ग मीटर रोपवाटीका) रोपकाढणीच्या ५ दिवस अगोदर रोपवाटीकेत टाकावे. • रोवणीपूर्वी रोपांची मुळे क्लोरोपायरीफॉस २०% प्रवाही @१० मि.ली. प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात तयार केलेल्या मिश्रणात १२ तास बुडवून ठेवावीत व नंतर रोवणी करावी. • धान रोपवाटीका तण विरहीत ठेवावी. • धान बांधावर झेंडूची सापळा पिक म्हणून लागवड करावी. • रोपांचे शेंडे तोडून बांबूच्या टोपलीत जमा करावी त्यामुळे रोपांच्या शेंड्यांवर असणारी खोडकीडींची अंडी नष्ट होवून त्यामधून परोपजिवी किटकसूद्धा बाहेर पडतील. • गराडीची पाने १.५ टन प्रति हेक्टर या प्रमाणात चिखलनीचे वेळी शेतात टाकावीत, यामुळे गादमाशी, तुडतुडे आणि खोडकिडीचा प्रादुर्भाव सुद्धा कमी होतो. • तुड्तुड्यांच्या व्यवस्थापनाकरिता रोपांची लावणी शिफारसीत अंतरावर (२० x १५ किंवा २० x २० सें.मी.), पट्टा पद्धतीने लागवड करावी (१० ओळी किंवा २ मीटर नंतर ३० सेमी. जागा मोकळी सोडावी). • रासायनिक खते:- जमिनीची तपासणी करुन योग्य प्रमाणात रासायनिक खताचा वापर केल्यास शेती किफायतशीर होते. सर्वसाधारणपणे १०० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ५० किलो पालाश प्रति हेक्टरी द्यावे. संपूर्ण स्फुरद व पालाश आणि नत्राची अर्धी मात्रा चिखलावर तर उरलेली नत्राची अर्धी मात्रा दोन समान हप्त्यात (फुटवे फुटण्याच्या वेळी साधारणपणे ३० दिवसांनी आणि लोंबी येण्याच्या सुरुवातीस साधारणपणे ६० दिवसांनी) विभागून द्यावी. • तण व्यवस्थापन:- उगवणपूर्व :- पेंडीमेथालिन ३० % ई. सी. @५० मिली रोवणीनंतर ४ ते ७ दिवसात किंवा प्रेटिलाक्लोर ५० % ई. सी. @ २० ते ३० मिली रोवणीनंतर ४ ते ७ दिवसात किंवा पायराझोसल्फुरॉन इथाइल १०% डब्ल्यु.पी. @ २ ते ३ ग्रॅम रोवणीनंतर ४ ते ७ दिवसात प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| कपाशी | • कपाशीमध्ये पिक उगवणीनंतर तन व्यवस्थापनासाठी, रुंद पानाच्या तन नियंत्रणासाठी पायरिथिओबॅक सोडियम १० % ईसी १२.५ मिली ते १५ मिली प्रती लिटर पाणी किंवा गवतवर्गीय प्रकारच्या तन नियंत्रणासाठी क्विझालोफॉप इथाइल ५ % ईसी १५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून जमिनीमध्ये पुरेसा ओलावा असताना फवारणी करावी. • पिक उगवणीनंतर रुंद व अरुंद पानाच्या तन व्यवस्थापनासाठी पायरिथिओबॅक सोडियम ६ % ईसी + क्विझालोफॉप इथाइल ४ % ईसी २० ते २५ मिली प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात स्थानिक स्वच्छ हवामान परिस्थिती असताना फवारणी करावी. • डवरणी आणि खुरपनीची कामे शक्यतो सकाळच्या वेळी करावी. प्रभावी तन व्यवस्थापनासाठी तन २ ते ३ पानावर असताना तन नाशकाचा वापर करावा. • ओलिताखालील संकरित कपाशीला ४० किलो नत्र (९० किलो युरिया प्रति हेक्टर) आणि कोरडवाहू संकरित/हिर्सुटम कपाशीला ४५ किलो नत्र (१०० किलो युरिया प्रति हेक्टर) या रासायनिक खताचा पहिला हप्ता वरखत म्हणून द्यावा. रस शोषणाऱ्या किडींच्या नियंत्रणासाठी, आर्थिक उंबरठा पातळीनुसार ॲसिटामिप्रिड २० एसपी १५ ग्रॅम प्रति हेक्टर किंवा फ्लोनिकमाइड ५०% @ ३ ग्रॅम प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात मिसळून फवारणी करावी. |

**फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:**

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| टोमॅटो | • ढगाळ वातावरण व आद्रता वाढल्यामुळे टोमॅटो पिकावर बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव वाढला असून बुरशीजन्य पानावरील ठिपके व करपा रोगाच्या व्यवस्थापनासाठी हेक्साकोनाझोल ७५% डब्ल्यू. जी. १-१.५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून स्वछ वातावरणात फवारणी करावी. |
| वांगे | • वांगी पिकावरील शेंडे व फळे पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी एकात्मिक कीड नियंत्रण पद्धतीचा अवलंब करावा. कीडग्रस्त फळे व शेंडे गोळा करून खड्ड्यात पुरावेत व एकरी १० या प्रमाणात कामगंध सापळे लावावेत. तसेच अळीच्या व्यवस्थापनासाठी आझाडीरेक्टीन १०००० पीपीएम २० मिली किंवा प्रोफेनोफॉस ५०% ई.सी. २० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून स्वछ वातावरणात फवारणी करावी. |
| संत्रा | • झाडाच्या बुंध्याजवळ पाणी साचू देऊ नये. साचलेले पाणी आधीच तयार केलेल्या निचरा मार्गाद्वारे (प्रणाली) काढून टाकावे. पावसाचे पाणी गोळा करण्यासाठी बागेच्या सखल भागात पर्जन्यजल संचयन तलाव खोदावेत. पाझर कमी करण्यासाठी तलावाच्या तळाशी प्लास्टिकचा थर पसरवता येईल. |

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| | मुसळधार पावसात लिंबूवर्गीय बागांच्या सखल भागात पृष्ठभागावर उघडे नाले खोदावेत. • ठराविक अंतराने निचरा मार्ग स्वच्छ करावे. • झाडांवरील फुटवे (Water Shoot)काढून टाकावे. • बाग तणमुक्त ठेवावी. • एक वर्षाच्या झाडासाठी १०८ ग्रॅम युरिया किंवा २५० ग्रॅम अमोनियम सल्फेट, १५७ ग्रॅम सिंगल सुपरफॉस्फेट द्या आणि खतासोबत २५ ग्रॅम झिंक सल्फेट, २५ ग्रॅम फेरस सल्फेट आणि २५ ग्रॅम मॅंगनीज सल्फेट द्यावे. दोन वर्षांच्या झाडासाठी दुप्पट, तीन वर्षांच्या झाडासाठी तिप्पट आणि चार वर्षे व त्यापुढील झाडांसाठी चौपट प्रमाणात खत द्या. झाडाला ओलसर जमिनीत खत द्यावे. जमिनीत पुरेसे शेणखत टाकावे. • या महिन्यात, आंबिया बहरातील फळांवर फायटोप्थोरा (Phytopthora) बुरशीचा हल्ला होण्याची शक्यता असते, ज्यामुळे फळांना तपकिरी कुज (brown rot) लागते. यावर नियंत्रण मिळवण्यासाठी, मेफेनोक्साम एमझेड ६८ (मेफेनोक्साम ४ + मेन्कोझेब ६४) २.५ ग्रॅम + कार्बेंडाझिम १ ग्रॅम यांच्या दोन फवारण्या ३० दिवसांच्या अंतराने कराव्यात. • या महिन्यात संत्र्यावर्गीय पाने खाणारी अळी (citrus leaf eating caterpillar) सक्रिय असते. या किडीची अळी अतिशय खादाड असून झाडांची पाने मोठ्या प्रमाणात खाऊन टाकते. सुरुवातीला अळी तपकिरी-काळी असते, पण नंतर ती हिरवी आणि मजबूत होते. एक लिटर पाण्यात फेनव्हॅलरेट २ मिली किंवा सायपरमेथ्रिन १ मिली किंवा फेनिट्रोथिऑन २ मिली मिसळून पानांवर फवारणी केल्यास कीड प्रभावीपणे नियंत्रित करता येते. • आंबिया बहारातील फळगळ थांबवण्यासाठी, लिंबूवर्गीय झाडावर १०० लिटर पाण्यात १.५ ग्रॅम २,४-डी किंवा जिबरेलिक ॲसिड (जीए), १०० ग्रॅम कार्बेंडाझिम आणि १ किलो युरिया मिसळून फवारणी करा. • महिन्याच्या अखेरीस, आंबिया पिकाच्या फळांवर रस शोषणाऱ्या पतंगाचा हल्ला होतो. कीड नियंत्रणासाठी, फळांना रंग येऊ लागण्याच्या अवस्थेत कडुलिंबाच्या तेलाची १० मिली/लिटर या प्रमाणात पानांवर फवारणी करा आणि पडलेली सर्व फळे खड्ड्यात गाडून नष्ट करा. ९०० मिली पाण्यात १०० ग्रॅम गूळ आणि १०० मिली संत्र्याचा रस मिसळून १० मिली मॅलाथिऑनचे विषारी आमिष वापरा (२५ झाडांसाठी दोन बाटल्या). लिंबूवर्गीय फळबागेत धूर पसरवण्यासाठी, शेणाच्या गोवऱ्यांमध्ये कडुलिंबाची ओलसर पाने मिसळून जाळा आणि ती वेगवेगळ्या ठिकाणी ठेवा. या उपायामुळे कीटकांना बागेत शिरण्यापासून दूर ठेवण्यास मदत होईल. |
| मिरची | • मिरची च्या ४ ते ६ आठवड्याच्या वयाच्या रोपांची लागवड वाफसा अवस्थेत करावी. • मिरचीच्या रोपांची लागवड करण्यापूर्वी रोपांचे शेंडे डायमेथोएट ३० ईसी १० मि. ली + पाण्यात मिसळणारे गंधक (८० %) ३ ग्रॅम + मॅन्कोझेब ७५ % डब्ल्यूपी २.५ ग्रॅम एक लिटर पाण्याच्या द्रावणात बुडवून लावावे. |

### पशुधन विषयक निहाय सल्ला:

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| बकरा किंवा बकरी | • शेळ्यांना पायखुरी/तोंडखुरी, घटसर्प आणि आंत्रविषार टाळण्याकरिता पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याने लसीकरण करावे. जनावरांना स्वच्छ आणि थंड पाण्याची सोय करावी. |
| गाय | • विजांचा कडकडाटासह मेघगर्जना होण्याची शक्यता लक्षात घेता गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्या व इतर पाळीव जनावरे मोकळ्या जागेत चरावयास सोडण्याचे टाळावे. |

### इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला:

| इतर (माती / जमीन तयार करणे) | इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला |
|---|---|
| सामान्य सल्ला | तननाशकाची खरेदी आणि फवारणी करताना लेबल नीट वाचून घ्यावे. ढगाळ हवामान व पाऊस असताना तननाशकाची फवारणी करू नये. वारा नसताना व जमिनीत पुरेसा ओलावा असताना उगवण पूर्व तन नाशकाची फवारणी करावी. फवारणीकरिता स्वच्छ पाणी वापरावे तसेच कडक उन्हात उगवण पश्चात फवारणी टाळावी. तन नाशकाचा वापर काळजीपूर्वक करावा. फवारणी पूर्वी फवारणी पंप स्वच्छ धुवून घ्यावा. ढगाळ हवामान असतांना फवारणी करू नये. शिफारशीत नसलेली भिन्न तननाशके एक मेकांत मिसळू नये. तननाशकाची फवारणी पूर्वी जमिनीमध्ये पुरेसा ओलावा असल्याची खात्री करावी. |

### हवामान चेतावण्यांचे संभाव्य प्रभाव (सामान्य):

• मेघगर्जना व विजांच्या कडकडाटामुळे शेतकरी, शेतमजूर तसेच पशुधनाला दुखापत होण्याची किंवा जीवितहानी होऊ शकते. पावसामुळे कृषी उत्पन्न बाजार समिती किंवा खुल्या बाजारात विक्रीसाठी आणलेला शेतमाल भिजून त्याची गुणवत्ता खराब होऊ शकते.

### परिणाम आधारित सल्ला (सामान्य):

प्रभाव आधारित सल्ला: मेघगर्जना, विजांचा कडकडाट व वादळी वायाचा अंदाज लक्षात घेता पशुधनास उघड्यावर चराई क्षेत्रावर चरावयास सोडणे टाळावे. जनावराना गोठया मध्येच चारा व पाण्याची व्यवस्था करावी. शेतात काम करताना मेघगर्जनेची चाहूल लागताच तात्काळ सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. जिह्यातील मागील घटनांचा संदर्भ लक्षात घेता मेघगर्जनेच्या वेळी पळस, कडूनिंब तसेच ईतर कोणत्याही झाडाखाली आश्रय टाळावा.

**Farmers are advised to download Unified �Mausam� and "Meghdoot" android application on mobile for Weather forecast and weather based Agromet Advisories and "Damini" android application for forecast of Thunderstorm and lightening.**

**Mausam MobileApp link: https://play.google.com/store/apps/details/**

**Meghdoot MobileApp link: https://play.google.com/store/apps/details**

**Damini MobileApp link : https://play.google.com/store/apps/details**